माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ९९/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. परमेश्वर किसनाजी बुटले,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय हिंगणघाट, ता. हिंगणघाट जि. वर्धा**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २६.०७.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| **द्वितीय अपील आदेशाचा दिनांक** | **आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक** | **मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** |
|---|---|---|
| ०१.०४.२०२१ | --- | १७.०६.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २७५१/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २६.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगणघाट, ता. हिंगणघाट जि. वर्धा, श्री. सागर कांबळे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, श्री. सतीश मासाळ उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २७५१/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सार्वजनिक अभिलेख असूनही व सदर अभिलेखाचा जतन कालावधी अभिलेखाच्या वर्गवारीनुसार अद्याप संपलेला नसल्यामुळे आणि तरी देखील सदर अभिलेख गहाळ/नष्ट झाला असल्यामुळे, योग्य निगा राखण्या/अभिरक्षा करण्या अभावी आढळ होत नसल्यामुळे सदर अभिलेख्याचे सन २०१० ते सन २०११ पासून कार्यरत सर्व अभिलेख अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ चे कलम ९ नुसार विभागीय व फौजदारी कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे. कार्यालय प्रमुख या नात्याने जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांनी संबंधितांविरुध्द कार्यवाही सुरू करुन तसे केल्याचा अनुपालन अहवाल पारित आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसात आयोगास सादर करावा.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारीत केलेला प्रत्येक आदेश कलम १९(७) नुसार संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारीत वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करुन अवमान केल्यास प्राधिकारणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. " असे आदेशित करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १२.०६.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २७५१/२०१९ मध्ये दिनांक ०१.०४.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशात, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सार्वजनिक अभिलेख असूनही व सदर अभिलेखाचा जतन कालावधी अभिलेखाच्या वर्गवारीनुसार अद्याप संपलेला नसल्यामुळे आणि तरी देखील सदर अभिलेख गहाळ/नष्ट झाला असल्यामुळे, योग्य निगा राखण्या/अभिरक्षा करण्याअभावी आढळ होत नसल्यामुळे सदर अभिलेख्याचे सन २०१० ते सन २०११ पासून कार्यरत सर्व अभिलेख अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ चे कलम ९ नुसार विभागीय व फौजदारी कार्यवाही करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांना केली आहे. तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगणघाट यांच्यावतीने दि. ०३.०६.२०२१ रोजी आदेशाची प्रत जिल्हाधिकारी, वर्धा यांना कार्यवाहीस्तव सादर केली असून यात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या भूमिकेचा ऊहापोह केला आहे.

प्रस्तुत प्रकरण हे जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्याकडे अद्याप प्रलंबित असून विद्यमान जिल्हाधिकारी, वर्धा यांनी संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेवून प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २६.०७.२०२३

जा.क्र.-7281----दि.------------
29 DEC 2023

प्रत- जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात येत आहे.